


'स्टच्यू ऑफ हिंदुभूषण'ला ऐतिहासिक गगनभेदी मानवंदना

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | शनिवार दिनांक 13/09/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 217 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# सी.पी.राधाकृष्णन यांचा उपराष्ट्रपती म्हणून शपथविधी

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून सी.पी. राधाकृष्णन यांना आज राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडपम येथे पदाची शपथ दिली.

या सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, अनेक केंद्रीय मंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र



विधानसभाचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधानपरिषदचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, राजकीय नेते, उच्चपदस्थ अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

सी. पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा राजीनामा दिला.

आता गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोपवला आहे.

उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. उपराष्ट्रपतीपदासाठी झालेल्या निवडणुकीत सीपी राधाकृष्णन यांनी प्रतिस्पर्धी इंडिया आघाडीचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला.

# अजित पवार स्वत: प्रत्येक नागरिकाची तक्रार ऐकून घेणार!

## महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादीची जनसुनावणी मोहीम

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या काही महिन्यांत होणार आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने जोरदार तयारी सुरू केली आहे. पुणेकरांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी 'राष्ट्रवादी जनसुनावणी' या नागरी संवाद उपक्रमाची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. येत्या १३ सप्टेंबर रोजी हडपसर येथून या उपक्रमाची सुरुवात होणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने हा उपक्रम पुणे शहर, पिंपरी-



चिंचवडसह राज्यातील अन्य भागांमध्ये राबविण्यात येणार आहे.

पुणे महापालिका निवडणुकीची प्रारूप प्रभाग रचना तयार करताना भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला विश्वासात घेतले नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक आणि कार्यकर्ते नाराज झाले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत पालिका निवडणुका स्वबळावर लढण्यासाठी तयारीला लागावे, असे सांगितले होते.

त्यानंतर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. त्यातूनच आगामी महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी राष्ट्रवादी जनसुनावणी मोहीम सुरू केली आहे. त्यातूनच १३ सप्टेंबर रोजी म्हणजे शनिवारी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत हडपसर मतदारसंघात नेताजी सुभाषचंद्र कार्यालय येथे जनसुनावणी घेणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार स्वतः प्रत्येक नागरिकाची तक्रार ऐकून घेणार आहेत. या तक्रारींचे विभागनिहाय वर्गीकरण केले जाणार आहे. तक्रारींवर वेळेवर कार्यवाही व्हावी, यासाठी काटेकोर फॉलोअप यंत्रणा सज्ज असणार आहे.

प्रत्येक तीन दिवसांनी उपमुख्यमंत्री अजित पवार स्वतः आलेल्या तक्रारींवर काय कार्यवाही झाली, याचा पाठपुरावा घेणार आहेत. या जनसुनावणीसाठी किऑस्क, व्हॉट्सॲप तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

# पिंपळे सौदागर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे जिरेटोप शिल्प उभारा



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

## नाना काटे

पिंपळे सौदागर प्रभाग क्र. २८ रहाटणी येथील कुणाल आयकॉन रोड वरील छत्रपती युवा चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे जिरेटोप शिल्प उभारण्यात यावे, अशी मागणी मा.विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हंटले आहे कि, प्रभाग क्र. २८ रहाटणी पिंपळे सौदागर मध्ये महानगरपालिकेच्या वतीने अनेक लोकउपयोगी प्रकल्प राबविले आहेत सुसज्य रस्ते, उद्यान, क्रीडांगणे, शिल्प व इतर प्रकल्प साकारण्यात आले असून, त्यानुसार महानगरपालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागामार्फत कुणाल आयकॉन रोड हा अत्याधुनिक पद्धतीने विकसित करण्यात येत असून रस्त्याचे काम देखील प्रगतीपथावर आहे, या कुणाल आयकॉन रोड वरील छत्रपती युवा चौक परिसरात येथे लहान मोठ्या खाजगी शाळा आहेत, अनेक सोसायट्या देखील या रोडवर आहेत नागरिक देखील या रस्त्याचा मोठ्या प्रमाणात वापर करत असतात, वाहतुकीचे पालन व्यवस्थित होईल या दृष्टीने, चौक सुशोभीकरण अंतर्गत पिंपळे सौदागर मधील कुणाल आयकॉन रोड वरील छत्रपती युवा चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे जिरेटोप असणारे शिल्प उभारण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# 'मावळ' पर्यटन तालुका म्हणून घोषित होणार!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मावळ : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात लोणावळा येथील कुरवंडे गावात प्रस्तावित टायगर पॉईंट प्रकल्पाबाबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या प्रकल्पासाठी ५ फेब्रुवारी २०२४ रोजीच ३३३ कोटी रुपयांची मान्यता मिळाली असून, पर्यटन विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प मावळ तालुक्याचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

बैठकीत या प्रकल्पात प्रवेशद्वार, टिकीट घर, फूड कोर्ट, स्नॅक बार, वाहनतळ, कनिष्ठ समारंभ हॉल अशा सुविधा उभारल्या जाणार आहेत.पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सायटसीईंग, झिप लाईन, बंजी जंपिंग, वॉल क्लायम्बिंग, फेरीस व्हील अशा साहसी खेळांचा समावेश करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे मनोरंजन व सुरक्षेतेच्या दृष्टीने झुला, रेन डान्स, स्केटिंग रिंक, पाण्याची टाकी, सीसीटीव्ही कॅमेरे, ध्वनीप्रणाली, प्रकाशयोजना यांचा प्रकल्पात समावेश असून, उन्हाळ्यातील वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या सुरक्षेवर विशेष भर दिला जाणार आहे. स्थानिकांना स्कायवॉकचा अनुभव मिळावा यासाठी दरमहा ध्वजवंदन सोहळा आयोजित करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला.

ॲडव्हेंचर व अम्युझमेंट पार्क उभारून मावळ तालुक्यातील पर्यटन सुविधा अधिक बळकट करण्याचा प्रस्ताव बैठकीत मांडण्यात आला.

त्याचप्रमाणे प्रकल्प परिसरात टेंटिंग व इतर निवास व्यवस्था उभारून पर्यटकांच्या मुक्कामासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

या प्रकल्पाच्या माध्यमातून मावळ तालुका पर्यटन तालुका म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविण्यात येणार असून, त्यामुळे रोजगारनिर्मिती वाढून ग्रामीण भाग समृद्ध होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

यावेळी या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार सुनील शेळके सुभाष शिरोळे, राजेश रासमुथ (नियोजन विभाग), रमेश जाणपुथकर (रामोजी फिल्म सिटी अध्यक्ष), डुंडे (निवासी अधिकारी – पुणे, VC वर), योगेश मेस्त्री (मायुक्त – PMRDA, VC वर), मंगेश वानखेडे (Guardian Media), गणेश आप्पा डोरे, दीपक हुलावळे, साहेबराव करके, विठ्ठलराव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर लोणावळा पर्यटनाला नवे रूप मिळेल आणि मावळ तालुका राज्यातील प्रमुख पर्यटन केंद्र म्हणून उदयास येईल, अशी माहिती मावळचे आमदार सुनील शेळके यांनी दिली.

# ‘अंदाजपत्रकात नागरिकांचा सहभाग’ उपक्रमाला प्रतिसाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी चिंचवड महापालिकेचा वर्ष २०२६-२७ चा अर्थसंकल्प अधिक लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या ‘अंदाजपत्रकात नागरी सहभाग’ या उपक्रमाला यंदा नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या अंदाजपत्रकासाठी महापालिकेच्या आठ प्रभागांमधून २ हजार ७०० पेक्षा जास्त नागरिकांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. मागील वर्षी या उपक्रमात २ हजार २७९ नागरिक सहभागी झाले होते. त्या तुलनेत यंदा चांगला प्रतिसाद मिळाला असून या उपक्रमात सहभागी होण्यासाठी १५ सप्टेंबर २०२५ अंतिम मुदत आहे.महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते १५ ऑगस्ट २०२५ रोजी या उपक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर नागरिकांना ऑनलाईन अभिप्राय देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. नागरिकांनी देखील या उपक्रमाला चांगला प्रतिसाद देत अभिप्राय नोंदवले. या अभिप्रायांमध्ये रस्त्यांचे नूतनीकरण, फूटपाथ बांधकाम, उद्यान विकास, जलनिस्सारण सुधारणा आणि नागरी सुविधा यांसह विविध प्रकारच्या कामांचा समावेश आहे.नागरिकांनी सूचवलेल्या कामासाठी त्यांच्या प्रभागातून वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के रक्कमेची तरतूद केली जाते. त्यानुसार अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये मागील वर्षी प्राप्त झालेल्या नागरिकांच्या सूचनांचा विचार करून आणि कामांचा प्राधान्यक्रम ठरवून १३६ कोटी ९८ लाख इतक्या निधीची तरतूद ४९९ कामांसाठी करण्यात आली होती. ज्यामध्ये रावेत येथील नवीन शाळा इमारत, पुनावळे येथील प्रमुख रस्त्याचे काम अशा विविध कामांचा समावेश होता.यंदाही या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. अद्यापही या उपक्रमासाठी ज्या नागरिकांना अभिप्राय नोंदवायचा असेल, त्यांनी १५ सप्टेंबर २०२५ पूर्वी तो नोंदवावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.असा नोंदवा अभिप्राय - नागरिकांना महापालिकेच्या pcmcindia.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन अर्ज भरून अभिप्राय नोंदवता येईल. तसेच नागरिक या https://www.surveymonkey.com/r/D8TBZRH लिंकला भेट देऊन ऑनलाईन अभिप्राय नोंदवू शकतात.पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲप डाउनलोड करून तेथेही नागरिकांना अभिप्राय नोंदवता येईल.

# महाआरोग्य शिबिराचा 350 हून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी: पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे सांगवी गावठाण येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात ३५० हून अधिक नागरिकांनी विविध तपासण्यांचा लाभ घेतला. यावेळी १०० हून अधिक नागरिकांचे आयुष्मान कार्ड तयार करून देण्यात आले.शिबिराचे उद्घाटन महापालिकेच्या सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. अंजली ढोणे यांच्या हस्ते,माजी महापौर माई ढोरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती सागळे, नोडल अधिकारी डॉ. वैशाली भामरे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रज्ञा बडगे, फिजिशियन डॉ. देवयानी लोंढे, बालरोगतज्ज्ञ डॉ. दीपक पाटील उपस्थित होते.

या शिबिरामध्ये नागरिकांसाठी दंत तपासणी, नेत्र तपासणी, कान-नाक-घसा तपासणी, बालकांची व किशोरवयीन मुलांची तपासणी, गर्भवती महिलांची तपासणी, वृद्ध नागरिकांची तपासणी, मानसिक आरोग्य तपासणी, लहान मुलांचे लसीकरण, रक्त तपासणी तसेच औषधांचे वितरण अशा सर्व सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

याशिवाय नागरिकांना आयुष्मान कार्डे व आभा कार्डे काढून देण्यात आले. भूलरोगतज्ज्ञ डॉ. मोनाली क्षीरसागर यांनी उपस्थितांना सीपीआरचे प्रात्यक्षिक करून आवश्यक ते मार्गदर्शन केले.

# झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाने केली सेवा कराची विक्रमी वसुली!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत शहरात महिलांना केंद्रस्थानी ठेवून एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत ‘सारथीसोनचीरै या’ शहर उपजीविका केंद्राशी संलग्न व पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाअंतर्गत कार्यरत असणाऱ्या महिला बचत गटांच्या प्रतिनिधींमार्फतझोपडपट्टीवासि यांना सेवाकर बिलांचे वितरण आणि मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलित केली जात आहे. या उपक्रमांतर्गत मार्च २०२५ पासून सेवाकर बिलांचे वितरण सुरू झाले असून तेव्हापासून आतापर्यंत झोपडपट्टीवासियांनी चांगला प्रतिसाद देत जवळपास ७६ लाख ८३ हजार ३९७ रुपयांचा विक्रमी सेवाकर जमा केला आहे.झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाच्या या उपक्रमाच्या माध्यमातून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली असून त्यांचा आत्मविश्वास वाढण्यासोबतच त्यांच्या कुटुंबांना आर्थिक बळकटी मिळत आहे. आज या महिला सेवाकर बिलांचे वितरण करण्यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मोबाईल ॲपच्या सहाय्याने माहिती देखील संकलित करीत आहेत. या उपक्रमामुळे झोपडपट्टी भागातील महिलांना रोजगार मिळाल्याने त्यांचा समाजातील दर्जा उंचावत असून त्यांच्या योगदानामुळे कुटुंब व समाजाच्या आर्थिक-सामाजिक उन्नतीत भर पडत आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ महसुलवाढीपुरता मर्यादित नसून महिलांच्या सबलीकरणाचे प्रतीक ठरला आहे.झोपडपट्टीवासियांना यापूर्वी अपुरे पत्ते, चुकीचा मोबाईल क्रमांक अशा समस्यांमुळे सेवा शुल्क बिल वेळेत मिळण्यामध्ये अडचणी निर्माण होत होत्या. मात्र आता या उपक्रमामुळे सेवा शुल्क बिल वेळेत मिळत असून झोपडपट्टीवासी स्वतःहून सेवा शुल्क भरण्यास पुढे येत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना वाढीस लागली आहे आणि महापालिकेच्या महसुलामध्येही वाढ होत आहे.

हा उपक्रम सुरू झाल्यापासून म्हणजेच १७ मार्च २०२५ पासून आजपर्यंत सुमारे ७६ लाख ८३ हजार ३९७ रुपयांची वसुली झाली आहे.

महसुलातील ही वाढ थेट शहराच्या विकासासाठी हातभार लावणारी ठरत आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 13/09/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# ‘स्टच्यू ऑफ हिंदुभूषण’ला ऐतिहासिक गगनभेदी मानवंदना

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे संपूर्ण जगाला हेवा वाटावा असे भव्य-दिव्य आणि सर्वांत उंच पूर्णाकृती शिल्प अर्थात “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात येत आहे. भगवा ध्वज हा शौर्याचे आणि स्वाभिमानाचे प्रतिक असून, या ध्वजाला आणि भगव्याच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या शंभुराजांच्या कार्याला मानवंदना देण्यासाठी महाराष्ट्रातील सर्वांत मोठा ढोल-ताशा ऐतिहासिक अन् गगनभेदी निनाद सोहळा आयोजित केला आहे.

बोऱ्हाडेवाडी-मोशी येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या जागेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि राज्य सरकारच्या मान्यतेने छत्रपती संभाजी महाराज यांचे पूर्णाकृती शिल्प आणि शंभुसृष्टी उभारण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार तथा




हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून हे अतिभव्य स्मारक उभारले जात आहे.महाराष्ट्रामध्ये ढोल-ताशा या पारंपरिक वादन सोहळ्याला विशेष महत्त्व आहे. ‘राज्य उत्सव’ म्हणून घोषित केलेल्या गणेशोत्सवात ढोल-ताशा पथकांनी अवघ्या देशाचे लक्ष वेधून घेतले.

परंपरा आणि संस्कृती जपणाऱ्या ढोल-ताशा महासंघाच्या वतीने जगातील सर्वांत उंच शिल्प “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” ला मानवंदना देण्याचा संकल्प मांडला होता. त्यानुसार, रविवार, दि. 14 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 3 वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, मोशी येथे ऐतिहासिक मानवंदना सोहळा होणार आहे.

तसेच, येत्या दि. 2 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजी महाराज पूर्णाकृती शिल्पाच्या तलवारीचे शस्त्रपूजन करण्यात येणार आहे, अशी माहिती हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे उपाध्यक्ष गणेश भुजबळ यांनी दिली.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे पराक्रमी पुत्र धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय ऐतिहासिक कार्याला ढोल-ताशांची ही मानवंदना अर्पण केली जाणार आहे. त्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या आणि धर्मरक्षणाच्या संघर्षमय कार्याचा जागर या माध्यमातून घडणार आहे. शिव-शंभूंचा विचार संपूर्ण जगभर पोहोचवण्याचा संकल्प हिंदुभूषण स्मारक ट्रस्टच्या वतीने केला आहे. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील शिव-शंभूप्रेमींमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. कारण, तब्बल 3 हजार ढोल, 1 हजार ताशा आणि 500 भगवे ध्वज यांसह ऐतिहासिक आणि गगनभेदी मानवंदना होणार आहे. मराठ्यांच्या इतिहासावर आधारित रोमांचक गीतांची झलकही पहायला मिळणार आहे. ‘शिवराय आणि शंभूराजांच्या विचारांचे मावळे’ म्हणून या ऐतिहासिक सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन ढोल-ताशा महासंघ आणि हिंदुभूषण स्मारक

# हाफकिन बायो-फार्मा कामगारांच्या प्रश्नांवर व्यवस्थापनाने तात्काळ उपायोजना करावे

## विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या सूचना

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : हाफकिन बायो-फार्मा पिंपरी चिंचवड येथील कामगारांच्या प्रश्नांवर व्यवस्थापनाने तात्काळ उपायोजना करावे असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.

हाफकिन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन लिमिटेडमधील कामगारांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात बैठक पार पडली.या बैठकीस हाफकिनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील



महेंद्रकर, कामगार प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.उपाध्यक्ष बनसोडे म्हणाले, पगाराव्यतिरिक्त थकीत देयके, निवासस्थान नुतनीकरण, निवासस्थानी दुर्घटना घडल्यास जबाबदारी, सातव्या वेतन आयोगाची थकबाकी, पदोन्नती अशा विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. पिंपरी-चिंचवडमधील कामगारांचे थकीत देणे किती आहे याची माहिती तातडीने उपलब्ध करून द्यावी, निवासस्थान नुतनीकरण टेंडर प्रक्रिया लवकरात लवकर करावी, तसेच व्यवस्थापनाने सर्व माहिती , रक्कमांसह पूढील आठवड्यात घेवून उपस्थित रहावे.यावेळी उपाध्यक्ष बनसोडे यांनी म्हणाले हाफकिनने तयार केलेले इंजेक्शन पुणे महानगरपालिकेला विक्रीसाठी प्रस्ताव करावा, त्यातून येणाऱ्या उत्पन्नातून कामगारांचे थकीत देणे भागवता येईल. यासाठी मी स्वतः प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी बैठकीत सांगितले.सदर बैठकीत महामंडळातील कामगारांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579